**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८८/२०२५**

**सीएनआर.क्र.एमएचबीयु-१५०००१६६२०२५**

**महाराष्ट्र सरकार(राज्य उत्पादन शुल्क, देऊळगावराजा-२) विरुध्द अशोक शामराव गायकवाड**

**न्यायनिर्णय**
**(दिनांक : २१/०७/२०२६ रोजी घोषीत)**

१. अभिलेखावर असलेल्या पुराव्यावरुन खालील वादप्रश्न माझ्या निर्णयार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | वादप्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दि.१८/११/२०२४ रोजी १०.१५ ते ११.१५ वाजणेचे सुमारास मौजे देऊळगावराजा ते देऊळगावमही रोडवरील बायपास जवळ कुंभारी शिवार ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा येथे आरोपी हे त्यांच्या ताब्यात बेकायदेशीररीत्या देशी दारुच्या १८० एमएलच्या १४४ नग शिश्या गाडीसह तसेच इतर मुद्देमाल असा मुद्देमाल एकुण रु.९०१००/- चा माल बाळगतांना मिळून आला काय हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | : | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | : | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

**कारणमिमांसा**

२. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी **साक्षीदार क्र.१ प्रदिप शेषराव देशमुख** (फिर्यादी), **साक्षीदार क्र.२ नैना वसंत देशमुख** (तपास अधिकारी) यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्याशिवाय अभियोग पक्ष **फिर्याद नि.क्र. ८, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ९, रासायनिक विश्लेषणाचा अहवालाकरीता पाठविलेले पत्राची पावती निशाणी-१०** या कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.

३. अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हासदृश्य तथ्य मिळून आल्याने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला. आरोपींतर्फे बचावा पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे वकील यांचा युक्तीवाद श्रवण केला.

<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :-

५. अभियोग पक्षाने केलेले आरोप सिध्द करण्यासाठी आद्य जबाबदारी अभियोग पक्षाची असते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यातुन आरोपींवर केलेले आरोप सिध्द करणे अभियोग पक्षाचे साद्य असते. आरोप सिध्द करणे म्हणजे त्या त्या गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातुन सिध्द करणे होय. अशा पुराव्याची सांगड घालताना अभियोग पक्षाला सर्वतोपरी काळजी घ्यावी लागते की, अशा पुराव्याच्या सादरीकरणातुन कोणताही वाजवी संशय निर्माण होणार नाही किंवा पुराव्यावर विश्वास ठेऊ नये अशी परिस्थिती उदभवणार नाही. पुराव्याचे निरीक्षण करताना हे लक्षात ठेवावे लागते की, जर निमार्ण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला मदत करतो म्हणुन उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे आवश्यक आहे.

६. आरोपी विरोधात आरोप केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी या चौकशीत अभियोग पक्षाला हे प्रस्थापित करावयाचे होते की, आरोपी हे अवैद्यरित्या देशी दारू व इतर साहित्य बाळगुन वाहतुक करतांना मिळून आले.

७. **साक्षीदार क्र.१ प्रदिप शेषराव देशमुख (फिर्यादी),** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१८/११/२०२४ रोजी ते दुय्यम निबंधक रा.ऊ.शु. देऊळगावराजा येथे कार्यरत असतांना त्यांना गोपनीय बातमीदाराद्वारा माहिती मिळाली की, देऊळगावराजा ते देऊळगावमही रोडवर कुंभारी शिवार रोडवर आरोपी दारूची अवैद्यरित्या मोटारसायकलद्वारे वाहतुक करत आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना बोलवून, त्यांना आशय समजावून सांगून पंच म्हणून हजर राहण्यास सांगितले व त्यानंतर ते, दोन पंच व इतर स्टाफ असे देऊळगावराजा ते देऊळगावमही रोडवर कुंभारी शिवार येथे जावुन थांबले असता तेथे आरोपी त्यांना मोटारसायकलवर येतांना दिसुन आला. आरोपीस त्यांनी हात दाखवुन थांबवले व मोटारसायकलजवळ जाऊन पाहणी केली असता तेथे तिन पुश्ट्यांच्या खोक्यात सखु संत्रा देशी दारुच्या १८० मिलीच्या १४४ सिलबंद बाटल्या एकुण रुपये ९०१००/- इतका माल मोटारसायकलसहीत मिळुन आला. आरोपीस आरोपीचे नाव विचारले असता ते नाव अशोक गायकवाड असे सांगितले. सदरील मालापैकी १८० मिली इतकी दारू रासायनिक अहवालाकामी काढुन पंचनामा केला. त्यानंतर, त्यांनी रा.ऊ.शु. देऊळगावराजा येथे येऊन आरोपीविरुध्द फिर्याद नि.क्र. ८ दिली.

८. **साक्षीदार क्र.२ नैना वसंत देशमुख (तपास अधिकारी)** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१८/११/२०२४ रोजी ते रा.ऊ.शु. कार्यालय देऊळगावराजा येथे कार्यरत असतांना ते व इतर स्टाफ असे पेट्रोलिंग करत असतांना त्यांना गोपनीय बातमीदाराद्वारा

माहिती मिळाली की, मौजे कुंभारी शिवारातील देऊळगावराजा ते देऊळगामही बायपास रोडजवळ येथे आरोपी देशी दारू अवैधरित्या मोटारसायकलने वाहतुक करत आहे. ते, दोन पंच व इतर स्टाफ असे तेथे जाऊन थांबले असता तेथे आरोपी त्यांच्या मोटारसायकलवर येतांना त्यांना मिळुन आला. त्यांनी आरोपीला थांबवून त्याचे नाव विचारले असता आरोपीने ते नाव अशोक गायकवाड असे सांगितले. त्यानंतर आरोपीच्या गाडीची झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन देशी दारुच्या १८० मिलीच्या १४४ सिलबंद बाटल्या व आरोपीच्या ताब्यातील मोटारसायकल असा एकुण किंमत रुपये ९०,१००/- इतका माल मिळुन आला. आरोपीला त्यांनी दारु बाळगण्याचा परवाना आहे का असे विचारले असता आरोपीने नाही सांगितले. त्यानंतर, सदरील माल ताब्यात घेऊन जप्त केलेले मुद्देमालापैकी १८० मिली इतकी दारू रासायनिक अहवालाकामी एका काचेच्या बाटलीत काढून तिस सिल लावून त्यावर त्यांची व दोन पंचांच्या स्वाक्ष-या घेतल्या. पंचनामा नि.क्र. ९ तयार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी सदरील नमुना रासायनिक अहवालाकामी पत्र नि.क्र. १० देऊन अमरावती येथील प्रयोगशाळेला पाठविला व त्यांच्याकडून त्याबाबतची पावती हस्तगत केली. त्यानंतर तपासांती आरोपीविरुध्द गुन्हासदृश्य तथ्य मिळुन आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

९. अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपीच्या ताब्यातुन विदेशी दारु व इतर साहित्य जप्त केली आहेत. सदर बाब फिर्यादी यांनी कथन केली असली तरी सदरील वरील नमुद रसायन ज्या स्वतंत्र पंच साक्षीदारांसमोर जप्त करुन पंचनामा तयार करण्यात आला असा एकही पंच तपासण्यात अभियोग पक्षास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे, पंचनामा नि.क्र. ९ अन्वये पंचनामा केल्याचे नमुद केले असलेतरी तरी परिपोषक पुराव्या अभावी पंचनामा पुर्णपणे शाबीत झाला असे निष्कर्ष काढणे विधीग्राह्य होणार नाही. त्यामुळे, जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केला आहे किंवा कसे त्याचप्रमाणे आरोपीचा व मुद्देमालाचा संबंध असल्याची बाब अभियोग पक्ष पुर्णपणे शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहे. त्याचप्रमाणे, अशी जप्ती झाली होती असे गृहीत धरले तरी ती मोहोरबंद बाटली रासायनिक विश्लेषणासाठी नि.क्र. १० प्रमाणे पाठविली होती हे दर्शविण्यासाठी संबंधित वाहकाचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषनाचा अहवालसुध्दा दाखल नाही. त्यामुळे पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

१०. या उपरोक्त दप्तरी आलेला पुरावा जरी जशास तसा ग्राह्य मानला तरी त्यांचा पुरावा आरोपीस गुन्ह्याशी जोडण्यास पुरेसा नाही. आरोपीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला नाही, त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल देशी दारु होती हे सिध्द झालेले नाही. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता जप्त मुद्देमालापैकी १८० मिली ही एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी पाठवली होती, परंतु त्याचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात कथित देशी दारु वाहतुक करतांना मिळून आली याबाबतचा कोणताही पुरावा

अभियोग पक्ष देण्यास असमर्थ ठरले आहे. तसेच, अभियोग पक्षाने सदरील पंचनाम्यावरील तपासलेले कोणतेही पंच पंच तपासलेले नसल्याकारणाने पंचनामा पुर्णपणे शाबीत झाल्याचे निष्कर्ष काढणे विधीग्राह्या होणार नसल्याने सदरील देशी दारु आरोपी हा वाहतुक करतांना त्याच्या ताब्यातून जप्त केलेले आहे हे देखील अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

**११.** वरील सर्व बाबींचा विचार करता हे स्पष्ट होते की, दारु बंदी अधिनियमाच्या संबंधित कलमानुसार दंडनीय गुन्हा या आरोपीने केले हे प्रस्थापित करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले आहे. म्हणजेच यापुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आवश्यक घटक सिध्द करण्यात किंवा त्याचे अस्तित्व प्रस्थापित करण्यात अभियोग पक्षाला पुर्णतः अपयश आले आहे हे स्पष्ट होते. करिता, सदरील आदेश हा अपिल कालावधीपर्यत कायम करण्यात येतो. त्यामुळे मी **वादप्रश्न क्र.१** चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता</u> :-**

**१२.** **वादप्रश्न क्र.१** च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी **वादप्रश्न क्र.२** च्या निष्कर्षा दाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १) | आरोपी नामे - **अशोक शामराव गायकवाड** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) नुसार मुंबई (महाराष्ट्र) दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(अ)(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून मुक्तता करण्यात येते. |
| २) | आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| ४) | मुद्देमाल (दारूच्या शिश्या) असल्यास तो पोलीसांनी अगर राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा विभागाने अपिल कालावधीनंतर रितसर नाश करावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

MAHESH SUNILDATT BHARAD
Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2026.07.21 17:31:12 +0530

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१,
देऊळगावराजा.

दिनांक :२१/०७/२०२६.

प्र मा ण प त्र

" मी याची पुष्टी करतो की, सदरील पीडीएफ फाईलमधील प्रत्येक शब्द नी शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे सारखेस आहेत."

लघुलेखकाचे नाव :- श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,

न्यायालयाचे नाव :- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, देऊळगावराजा.

आदेश/न्यायनिर्णयाचा दिनांक :- २१/०७/२०२६

श्रुतलेखनाचा दिनांक :- २१/०७/२०२६

तपासलेले आणि स्वाक्षरी दिनांक :- २१/०७/२०२६

अपलोड केल्याचा दिनांक :- २१/०७/२०२६

स्वा/-

(श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,)

लघुलेखक.